जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 APR 2024

# व्ही. एन. शिंदे यांना 'आठले पुरस्कार'

## मराठी विज्ञान परिषदेकडून निवड; पर्यावरणविषयक कार्याची दखल



कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल विशेष अभिनंदन पत्र प्रदान करून त्यांचा गौरव करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डावीकडून डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. सागर डेळेकर.

कोल्हापूर, ता. ५ : येथील विज्ञान लेखक आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना मराठी विज्ञान परिषदेने प्रतिष्ठेचा सुधाकर उद्धवराव आठले पुरस्कार-२०२४ जाहीर केला आहे. मुंबई येथे २८ एप्रिल रोजी पुरस्कार प्रदान सोहळा होईल, अशी माहिती परिषदेचे कार्यवाह प्रा. भालचंद्र भणगे यांनी पत्राद्वारे दिली आहे.

महाराष्ट्रात विज्ञान प्रसार व जागृतीच्या अनुषंगाने कार्यरत असलेल्या प्रतिष्ठित मराठी विज्ञान परिषदेतर्फे समाजात विज्ञान प्रसार तसेच वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविण्याकरिता किमान दहा वर्षे विविध प्रकारे कार्य करणाऱ्या, पण ६० वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या व्यक्तीला सुधाकर उद्धवराव आठले पुरस्कार देऊन गौरविले जाते. सन २०२४ च्या पुरस्कारासाठी डॉ. शिंदे यांची निवड केली आहे. रुपये २५ हजार आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी अभिनंदनाचे पत्र देऊन डॉ. शिंदे यांचे अभिनंदन केले. डॉ. शिंदे यांची एककांचे मानकरी, हिरव्या बोटांचे किमयागार, असे घडले भारतीय शास्त्रज्ञ, आवर्त सारणी व मूलद्रव्यांची दुनिया, एककांचे इतर मानकरी आणि कृषीक्रांतीचे शिलेदार पुस्तके प्रकाशित आहेत.

> “ विज्ञान, पर्यावरण विषय माझ्यासाठी खूप महत्त्वाचे आहेत. त्यासाठी केलेल्या कार्याचा गौरव या पुरस्काराने झाला असून यापुढील वाटचालीसाठी मला तो बळ देणारा आहे.
>
> **-डॉ. व्ही. एन. शिंदे**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 APR 2024

पुण्यनगरी



कोल्हापूर : कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचा गौरव करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, आदी मान्यवर.

# डॉ. व्ही. एन. शिंदे यांना सुधाकर आठले पुरस्कार

कोल्हापूर : प्रसिद्ध विज्ञान लेखक आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नेताजी तथा व्ही. एन. शिंदे यांना मराठी विज्ञान परिषदेकडून प्रतिष्ठेचा सुधाकर उद्धवराव आठले पुरस्कार-२०२४ जाहीर करण्यात आला आहे, अशी माहिती परिषदेचे कार्यवाह प्रा. भालचंद्र भणगे यांनी पत्राद्वारे दिली आहे.

दि. २८ एप्रिल रोजी होणाऱ्या मराठी विज्ञान परिषदेच्या ५८ व्या वर्धापन दिन कार्यक्रमात हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येईल. मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर प्रमुख पाहुणे असतील, तर परिषदेचे अध्यक्ष डॉ. ज्येष्ठराज जोशी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित असतील. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सागर डेळेकर उपस्थित होते.

## डॉ. शिंदे यांच्या विज्ञान प्रसार कार्याचा गौरव

'डॉ. शिंदे गेली दहा वर्षांहून अधिक काळ आपली लेखणी, वाणी आणि प्रत्यक्ष कार्य या माध्यमातून विज्ञानविषयक जागृतीचे कार्य करीत आहेत. हा पुरस्कार त्यांच्या या कार्याचा गौरव आहे. विद्यापीठाचा परिसर ही त्यांच्या जल, वनस्पती आणि विज्ञानविषयक कार्यासाठीची प्रयोगशाळाच आहे.

डॉ. दिगंबर शिर्के,
कुलगुरू शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 APR 2024
लोकमत

# व्ही. एन. शिंदे यांना आठले पुरस्कार



कोल्हापूर : येथील विज्ञान लेखक व विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना मराठी विज्ञान परिषदेचा सुधाकर आठले पुरस्कार जाहीर झाला. येत्या २८ एप्रिलला मुंबई येथे पुरस्कार प्रदान सोहळा होईल. कार्यवाह प्रा. भालचंद्र भणगे यांनी पत्राद्वारे ही माहिती दिली.

समाजात विज्ञान प्रसार, तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याकरिता किमान दहा वर्षे कार्य करणाऱ्याला हा पुरस्कार दिला जातो. २०२४च्या पुरस्कारासाठी डॉ. शिंदे यांची निवड झाली. २५ हजार आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. २८ एप्रिलला होणाऱ्या मराठी विज्ञान परिषदेच्या वर्धापन दिन कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान केला जाईल. मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर प्रमुख पाहुणे असतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 APR 2024
पुढारी

# विद्यापीठाकडून उन्हाळी सत्रातील २८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तरच्या २८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारी मास्टर ऑफ आर्ट्स, बॅचलर ऑफ एज्युकेशन, बॅचलर ऑफ इंटिरिअर डिझाईन, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ जर्नालिझम आदी ९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयामध्ये पार पडल्या. परीक्षेला १ हजार ३०२ विद्यार्थी प्रविष्ठ झाले. त्यापैकी १७३ विद्यार्थी अनुपस्थित राहिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 APR 2024
लोकमत



लुधियाना (पंजाब) येथील कृषी विद्यापीठात झालेल्या ३७ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठ संघाला मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

# विद्यापीठाला दोन सुवर्णपदके

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : लुधियाना (पंजाब) येथील कृषी विद्यापीठात झालेल्या ३७ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठ संघाने २ सुवर्णपदके व ३ रौप्यपदक प्राप्त केले.

या महोत्सवात विद्यापीठाचा एकूण २१ सदस्यांचा संघ सहभागी झाला होता. पोस्टर मेकिंगमध्ये प्रथम क्रमांक, व्यंगचित्रामध्ये प्रथम, रॅलीत द्वितीय, पाश्चिमात्य समूहगीतमध्ये द्वितीय, एकांकिकेत द्वितीय क्रमांक मिळवला. यामध्ये २ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक तर १५ विद्यार्थांना रौप्यपदक मिळाले. या युवा महोत्सवामध्ये देशभरातील १३८ विद्यापीठांनी सहभाग घेतला होता.

विद्यापीठ संघास कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु प्रा. डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. संघासोबत विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. पी. टी. गायकवाड उपस्थित होते. व्यवस्थापक म्हणून डॉ. संगीता पाटील, डॉ. लक्ष्मीकांत वेळेकर, विजय इंगवले, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 APR 2024
सकाळ



कोल्हापूर : लुधियाना येथील राष्ट्रीय युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने दोन सुवर्ण आणि तीन रौप्यपदकांची कमाई केली.

# शिवाजी विद्यापीठाची 'सुवर्ण' कामगिरी

## राष्ट्रीय युवा महोत्सवः तीन रौप्यपदकांचीही कमाई

कोल्हापूर, ता. ५ : लुधियाना येथील पंजाब कृषी विद्यापीठात ३७ वा राष्ट्रीय युवा महोत्सव २८ मार्च ते एक एप्रिलदरम्यान रंगला. त्यात देशभरातील १३८ विद्यापीठांनी सहभाग घेतला. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघाने दोन सुवर्ण आणि तीन रौप्यपदकाची कमाई केली.

या महोत्सवात विद्यापीठाचा एकूण २९ विद्यार्थी कलाकारांचा संघ सहभागी झाला. या संघाने पोस्टर मेकिंग, व्यंगचित्र प्रकारामध्ये प्रथम क्रमांक पटकविला. रॅली आणि पश्चिमात्य समूहगीत, एकांकिका प्रकारामध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. त्यात सहभागी झालेल्या दोन विद्यार्थ्यांना सुवर्णपदक आणि १५ जणांना रौप्यपदक मिळाले. त्यांच्या समवेत विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, संघव्यवस्थापक डॉ. संगीता पाटील (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पलूस), डॉ. लक्ष्मीकांत वेळेकर (मुधोजी कॉलेज फलटण), वरिष्ठ सहायक विजय इंगवले उपस्थित होते.